मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

RNI No. MAHMAR/2016/72543

| वर्ष ७ वे | अंक : ०५ | रविवार ०४ मे ते १० मे २०२५ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४ |



सौ. रुबिना मुल्ला
कार्यकारी संपादिका
मो-९८९०८७९७५७

पान २ — संपादकीय — असुरक्षिततेकडून

पान ३ — भारतामध्ये मुस्लिमांनी दान..

पान ४ — पालघर जिल्हा पोलीस ...




## मृतकांच्या नावाने पैसे उकळण्याचा ठेकेदारांचा घाट ?
## वसई विरार महापालिकेत घन कचरा विभागात भ्रष्टाराचा सुगंध !

### रुबिना मुल्ला यांना माहिती देण्यास महापालिकेची टाळाटाळ,लोकायुक्त कार्यालयाकडून संबंधितांवर कारवाई होणार ?

विरार (प्रतिनिधी) : वसई विरार महापालिकेच्या घन कचरा विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप समाजसेविका रुबिना मुल्ला यांनी केला असून यामुळे महापालिका प्रशासनाला प्रचंड नुकसान सोसावं लागत असल्याने रुबिना मुल्ला यांनी याबाबत महापालिकेच्या संबंधित विभागाकडे ठेका देण्यात आलेल्या ठेकेदारांच्या कामाची माहिती एका पत्राद्वारे मागितली असता सदर माहिती देण्यास महापालिका टाळाटाळ करीत असल्याने महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने घन कचरा विभागात भ्रष्टार सुरू असल्याचा संशय रुबिना मुल्ला यांनी व्यक्त केला आहे.त्यानुषंगाने वसई विरार महापालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार घन कचरा विभागाने नेमून दिलेले ठेकेदार साई गणेश इंटरप्रायझेस,हेना इंटरप्रायझेस,अनंत इंटरप्रायझेस, उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर ,रेनबो इंटरप्रायझेस,दिनेश संखे, मंदिप इंटरप्रायझेस,आर. बी इन्फाटेक आदि ठेकेदार कंपन्यांना मनपाच्या वेगवेगळ्या झोनचा घन कचरा व्यवस्थापनाचा ठेका लाखो रुपयांत देण्यात आला आहे.याबाबत रुबिना मुल्ला यांच्या माहिती अधिकारानुसार वरील सर्व ठेकेदार त्यांच्या हजेरी दस्तावेजात मजुरांच्या नावाने ऑफिसच्या आणि घरातील व्यक्तींसह मृतक व्यक्तींच्या नावानेही पैसे उकळण्याचा घाट घातला जात असून ठेकेदार घन कचरा व्यवस्थापनाचे पैसे घोटाळा करून स्वतःच्या घश्यात घालत असल्याचा खळबळजनक आरोप करण्यात आला असून या भ्रष्टाचाराबाबत रुबिना मुल्ला यांनी १६ जानेवारी रोजी २०२५ पासून वारंवार घन कचरा व्यवस्पथपानातील घोटाळ्याची माहिती मिळवण्यासाठी पत्रव्यवहार करून सदर कंपन्यांना देण्यात आलेल्या ठेकेदारांच्या कामाबाबतची माहिती मागवली होती.परंतु त्यावेळी मनपाचे सेवानिवृत सुकदेव दरवेशी व इतर सर्व विभागाचे जनमाहिती अधिकारी, केदारे , जितेंद्र नाईक, धुमाळ, गुंजाळकर आदींसह प्रथम अपिलीय अधिकारी नानासाहेब कामठे यांनी आपसात संगनमताने उडवा उडवीची उत्तरे देत वेळ मारून नेली.आणि त्यानंतरही रुबिना मुल्ला यांनी ठेक्याच्या माहितीसाठी वारंवार स्मरण पत्र देवूनही वसई विरार महापालिकेने त्यास आतापर्यंत केराची टोपलीच दाखवली आहे.तर याबाबत रुबिना मुल्ला यांनी महाराष्ट्र राज्याच्या लोकायुक्त आणि उप लोकायुक्त कार्यालयात तक्रार दाखल केली असता सदर कार्यालयातील कक्ष अधिकारी र. सु.साठे यांच्या लेखी पत्रानुसार रुबिना मुल्ला यांच्या तक्रारीची दखल घेण्यात आली असून रुबिना मुल्ला यांना माहिती देण्याचे आदेश ईमेल द्वारे कळवण्यात आले आहे.परंतु असे असतानाही मनपाचे वरील सर्व अधिकारी आपापसात संगनमताने रुबिना मुल्ला यांना घनकचरा ठेकेदारा संदर्भात माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत.त्यामुळे याप्रकरणी संबंधितांवर माहितीच्या अधिकाराची माहिती देण्याबाबतचा दिरंगाई अधिनियम कलम १९(८) क च्या तरतुदीनुसार

पान नं. 2



### वसई विरार महापालिका अखत्यारीतील राजीवलीतील आरसी मारुती विद्यालयाच्या इमारतीच्या अनधिकृत बांधकामाला कोणाचा आशीर्वाद ?

## सामाजिक कार्यकर्ता जावेद खान यांची संबंधितांवर एमआरटीपी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी....

वसई (प्रतिनिधी) :- वसई विरार शहर महापालिकेच्या हद्दीतील मौजे राजीवली येथील सव्हे नंबर १५६/२ या जमिनीवर उभारण्यात आलेली आरसी मारुती हायस्कूल आणि कनिष्ठ विद्यालयाची इमारत अनधिकृत असल्याचे सामाजिक कार्यकर्ता जावेद खान यांनी उघड करीत सदर इमारत जागा मालकासह विकासक आणि भोगवटदार यांच्यावर एमआरटीपी अंतर्गत दखलपात्र गुन्हा दाखल करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ता जावेद खान यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.त्यानुषंगाने मौजे राजीवली येथील सव्हे नं.१५६/ २ अ या जागेत तळ अधिक १ मजल्याची आरसी मारुती हायस्कूल आणि कनिष्ठ विद्यालयाच्या नावाने इमारत उभारली आहे.दरम्यान सदर इमारतीची कुठल्याही प्रकारची बांधकाम परवानगी घेतलेली नसल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ता जावेद खान यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झाली आहे.तसेच याबाबत मनपाच्या वालीव प्रभागात

पान नं२



### वसईतील सातिवलीतील राजदीप इंडस्ट्रीत अनधिकृतपणे सुरू असलेल्या बांधकामावर कारवाईसाठी आयुक्तांना साकडे

वसई (प्रतिनिधी):- वसई तालुक्यातील सातिवलीतील राजदीप इंडस्ट्रीत अनाधिकृतपणे बांधकाम सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार सुरू असून सदर अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाईची मागणी करण्यात आली आहे, वसई विरार महापालिकेच्या आयुक्तांकडे एका लेखी निवेदनाद्वारे तक्रादार यांनी तक्रार केली आहे.त्यानुसार, वसई विरार महापालिकेच्या अंतर्गत असलेल्या सातिवली येथील मौर्यानका या ठिकाणी मुख्य रस्त्याच्या शेजारीच राजदीप इंडस्ट्रियल नावाची कंपनी आहे.त्या कंपनीला अनधिकृत रित्या सुमारे दहा ते पंधरा फूट भिंत वाढवण्यात आली आहे. तर संपूर्ण कंपनीच्या सभोवताली अवैधपणे पत्र्याचे शेड

पान नं२

# संपादकीय...!

## असुरक्षिततेकडून सन्मानाकडे...

कामगार हक्क, सुरक्षितता आणि सन्मान या गोष्टींची चर्चा होते तेव्हा असंघटित क्षेत्रातील महिला सातत्याने दुर्लक्षित राहतात. आजच्या कामगार दिनानिमित्त यावर दृष्टिक्षेप...

भारतात असंघटित क्षेत्र हा अर्थव्यवस्थेचा एक अत्यंत मोठा भाग आहे. अंदाजे ९० टक्के कामकाज या क्षेत्रात होते, जिथे सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही आणि करप्रणालीचे पालन केले जात नाही. त्यामुळे, हे क्षेत्र बऱ्याच अंशी दुर्लक्षित आणि अनियंत्रित आहे. कुठेही नोंदणी नसलेल्या या कामगार वर्गाचे भारतीय अर्थव्यवस्थेत मोठे योगदान आहे. यामधली महिलांची अचूक संख्या सांगणे जिकिरीचे असले तरी २०१८ साली आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवालानुसार भारतात एकूण कामगार महिलांमधील सुमारे ८० टक्के महिला या असंघटित क्षेत्रांत काम करतात, यावरून महिलांच्या असंघटित क्षेत्रातील संख्येचा अंदाज यावा.असंघटित क्षेत्रामध्ये घरगुती कामगार, रस्त्यावर विक्री करणाऱ्या महिला, शेती कामगार, लघु उद्योग करणाऱ्या तसेच कचरावेचक अशा अनेक महिला येतात. प्रामुख्याने ज्या महिलांना स्वतःला कौशल्य वाढवण्यासाठी आणि चांगली आर्थिक संधी मिळवण्यासाठी योग्य संसाधने उपलब्ध नाहीत, अशा महिला असंघटित क्षेत्रांच्या खाईत लोटल्या जातात. त्यांचे काम हे श्रमप्रधान असल्याने त्याला फारशी सामाजिक मान्यता मिळत नाही. कामाचे दीर्घ तास, अत्यल्प मोबदला, कोणतीही पूर्वसूचना न देता सहजपणे काढून टाकण्याची सोय आणि कोणतेही सामाजिक संरक्षण नसणे, ही या क्षेत्रातील महिलांची कायमची परिस्थिती आहे. काम सारखे असले तरीही आपल्या पुरुष सहकाऱ्यापेक्षा कमी वेतन हा असंघटित क्षेत्रातील महिलांवर परिणाम करणारा आणखी एक घटक आहे.या आर्थिक असमानतेमुळे गरिबीचे चक्र कायम राहते. गरिबी आणि तक्रार निवारण्यासाठी कोणत्याही भक्कम व्यवस्थेच्या अभावाखातर या महिला मानसिक आणि शारीरिक शोषणाच्या सहजपणे बळी ठरतात. घरकाम करताना होणारे चोरटे स्पर्श, बांधकामाच्या ठिकाणी वापरलेले आक्षेपार्ह शब्द किंवा थेट केलेली शारीरिक सुखाची मागणी या सगळ्या सामाजिक, आर्थिक आणि संरचनात्मक असुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर, कामाच्या ठिकाणी महिलांच्या सन्मान व सुरक्षिततेची हमी देणारा 'कामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा, २०१३' (पॉश कायदा) विशेष महत्त्वाचा ठरतो. विशेषतः असंघटित क्षेत्रातील महिलांसाठी, जिथे कोणताही औपचारिक करार, तक्रारीचं व्यासपीठ किंवा संरक्षक व्यवस्था नसते, तिथे हा कायदा त्यांचं एकमेव कायदेशीर कवच आहे.या कायद्याचा उद्देश कोणत्याही महिलेला, मग ती कोणत्याही पदावर कार्यरत असो किंवा कोणत्याही स्वरूपाच्या कामात गुंतलेली असो, तिच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि भयमुक्त वातावरण मिळवून देणं हे आहे. या कायद्याचा पाया भंवरीदेवी या गाजलेल्या प्रकरणाने घातला. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने १९९७ मध्ये 'विशाखा मार्गदर्शक तत्त्वे' जाहीर केली. या तत्त्वांमधून महिलांना कामाच्या ठिकाणी सुरक्षितता मिळावी यासाठी उपाययोजना सुचवण्यात आल्या, मात्र असंघटित क्षेत्रातील महिलांच्या विशिष्ट गरजांकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. यामुळे असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांनाही योग्य संरक्षण मिळावे, यासाठी स्वतंत्र आणि स्पष्ट कायदेशीर चौकट उभारण्याची गरज निर्माण झाली. याच पार्श्वभूमीवर, विशाखा मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित असूनही अधिक व्यापक आणि समावेशक अशा 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध, प्रतिकार आणि निवारण कायदा, २०१३' (पॉश) ची निर्मिती झाली.या कायद्यात प्रथमच औपचारिक संस्थांबरोबरच असंघटित क्षेत्रांत काम करणाऱ्या महिलांसाठीही विशेष तरतुदी करण्यात आल्या. या कायद्याअंतर्गत, प्रत्येक कार्यालयाने, जिथे दहा किंवा अधिक कर्मचारी आहेत, त्याठिकाणी 'अंतर्गत तक्रार समिती' ( घ्ण्ण) स्थापन करणं बंधनकारक आहे. मात्र ज्या ठिकाणी औपचारिक संस्था नाही, मग ती घरगुती कामगार असो, शेतमजूर असो किंवा रस्त्यावर विक्रेता असो, तिला लैंगिक छळाच्या प्रसंगी न्याय मिळवण्यासाठी एक अधिकृत मंच उपलब्ध होईल, या हेतूने त्या ठिकाणी 'जिल्हास्तरीय स्थानिक तक्रार समित्या' (लोकल कंप्लेंट्स कमिटी) स्थापण्याचा निणर्य घेण्यात आला. या समितीचे उद्दिष्ट म्हणजे लैंगिक छळाच्या तक्रारींचे तातडीने, पारदर्शक आणि निष्पक्ष निवारण करणं. तीन वर्षांचा कार्यकाळ असलेल्या समितीमध्ये महिला सदस्यांची संख्या अधिक असावी, तसंच स्वतंत्र सदस्याची नियुक्ती करून तक्रार करणाऱ्या महिलेला सुरक्षिततेची हमी दिली जावी, अशीही अट आहे.पण प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे.असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना या कायद्याच्या अस्तित्वाची माहिती नसते. ज्या काही महिला अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचा प्रयत्न करतात, त्यांनाही सामाजिक दबाव, बदनामी होण्याची भीती, नोकरी गमावण्याचा धोका किंवा कुटुंबाच्या मदतीचा अभाव या कारणांमुळे आपली तक्रार मागे घ्यावी लागते. विशेषतः घरगुती मदतनीस म्हणून काम करणाऱ्या महिला, ज्या एकट्याने घराघरात काम करतात, किंवा फेरीवाल्या महिला, ज्या सार्वजनिक जागी असुरक्षिततेच्या स्थितीत असतात, त्यांच्यासाठी हे वातावरण अधिकच जोखमीचं ठरतं.जिथे दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यक्ती कामासाठी एकत्र येतात, त्या प्रत्येक ठिकाणी हा कायदा लागू होतो. त्यामुळे घरगुती मदतनीस, शेतमजूर, बांधकाम कामगार, रस्त्यावर विक्री करणाऱ्या महिला सर्वांनाच या कायद्याने संरक्षण आहे.त्यामुळे, पॉश कायद्याची प्रभावी अंमलबजावणी ही केवळ कायद्याच्या कागदी अस्तित्वापुरती मर्यादित न राहता, प्रत्यक्षात त्याचा उपयोग होण्यासाठी जागरूकतेची चळवळ उभारणं काळाची गरज आहे. यासाठी काही ठोस उपाययोजना जाणीवपूर्वक राबवणं आवश्यक आहे.त्यातले पहिले आणि महत्त्वाचे म्हणजे असंघटित कामगार महिलांपर्यंत ही माहिती पोहोचवणे. त्यांच्यामध्ये विविध माध्यमांद्वारे जागृती निर्माण करणे.त्यामध्ये गावोगावी, वस्त्यांमध्ये, बांधकाम साइट्सवर, बाजारपेठांमध्ये, आणि शेतांमध्ये पॉश कायद्याविषयी माहिती देणाऱ्या जनजागृती मोहिमा , कार्यक्रम, चर्चासत्रं इत्यादी आयोजित करणे. स्थानिक पंचायत, महापालिका, स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्याने मोफत प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा आयोजित करून पॉश कायदा समजावणं, महिलांच्या हक्कांबाबत त्यांना जागरूक करणं आणि तक्रार कशी, किती दिवसांत व कोणाकडे करायची याचे प्रशिक्षण देणे, जिल्हास्तरीय स्थानिक तक्रार समितीच्या संपर्क क्रमांकांचा प्रसार, बैठका, हेल्पलाइन सेवा इत्यादी सुविधा सुविधा बळकट करणे व महिलांपर्यंत पोहचविणे आवश्यक आहे; तसेच लैंगिक छळाविरुद्ध तक्रार करणाऱ्या वा आवाज उठविणाऱ्या महिलांना मानसिक आधार, समुपदेशन, आणि कायदेशीर मदत सहज उपलब्ध करून देणे हे देखील यादृष्टीने टाकलेले महत्त्वाचे पाऊल ठरेल.कामगार दिनाच्या निमित्ताने, आपण 'पॉश'चा पुनर्विचार करायला हवा, तो केवळ कायदा म्हणून नव्हे, तर 'कामगार म्हणून स्त्रियांच्या सन्मानाची खात्री' म्हणून. कारण प्रत्येक स्त्री, ती कोणत्याही वर्गातील, जातीय, आर्थिक पार्श्वभूमीची असो, तिच्या श्रमाचा, तिच्या अस्तित्वाचा, तिच्या आवाजाचा सन्मान होणं हीच खरी 'कामाची सुरक्षितता' आहे. यासाठी केवळ कायदे नाहीत, तर स्थानिक स्तरावर महिला कामगारांचे संघटन, प्रशिक्षण, सामुदायिक चर्चा, आणि पुरुष सहकाऱ्यांचे भान वाढवणं ही पावलं महत्त्वाची आहेत. स्त्रियांना कामाच्या ठिकाणी सन्मानित वाटणं म्हणजे फक्त तक्रार नोंदवण्याचा अधिकार नव्हे, तर 'माझा आवाज, माझं काम, आणि माझं अस्तित्व या व्यवस्थेत महत्त्वाचं आहे,' ही भावना ज्या दिवशी त्यांच्यात रुजेल, त्यादिवशी खऱ्या अर्थाने या व्यवस्थेत त्या सन्मानाने जगू शकतील.

(लेखिका महिला आणि कामगार यांच्या हक्कांसाठी काम करतात.)

## मृतकांच्या नावाने पैसे ..पान नं. १

शिस्तभंगाच्या कारवाईची आर्तहाक रुबिना मुल्ला यांनी प्रशासनास केली असून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशीसह लोकायुक्त कार्यालय संबंधित वसई विरार महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का ? वसई विरार महापालिका आयुक्त सदर प्रकरणाबाबत चौकशी करून संबंधितांवर कारवाईचे आदेश देणार का ? तसेच या भ्रष्टाचारात जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सहभागी असल्यास त्यांच्यावर कारवाई होईल का ? याकडे समाजसेविका रुबिना मुल्ला यांचे लक्ष लागले असून त्यांच्याकडून न्यायाची मागणी होत असून या भ्रष्टाचारात जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी शामिल असल्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही समाजसेवक रुबिना मुल्ला यांनी माहिती अधिकारात शेवटी म्हंटले आहे.

सर्व ठेकेदारांच्या म्हणण्यानुसार,अपिलीय अधिकारी आणि वरिष्ठांपर्यंत आर्थिक साटेलोटे करून गैरव्यवहारातून घनकचरा व्यवस्थापनाच्या कामात भ्रष्टाचार होत आहे.

## वसई विरार महापालिका अखत्यारीतील...पान न. १

२४ जानेवारी रोजी केलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगानेही उभारलेल्या जागेतील विद्यालयाच्या इमारतीची कुठलीही परवानगी नसल्याचे समजते.परंतु असे असतानाही सदर इमारतीचे बांधकाम १० एप्रिल पासून अनधिकृतपणे सुरूच असल्याने संबंधित भूमाफिया बांधकाम विकासक, मालक यांना प्रशासनाच्या कारवाईचा धाक राहिलेला दिसून येत नसल्याचे निवेदनात नमूद केले असून या आरसी मारुती विद्यालयाच्या अनधिकृत बांधकाम करणाऱ्या संबंधितांवर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे अनुसार एमआरटीपी अंतर्गत दखलपात्र गुन्हा दाखल करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ता जावेद खान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह वसई विरार महापालिका आयुक्त व संबंधित विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## वसईतील सातिवलीतील राजदीप....पान नं. १

टाकण्याच्या कामासह पहिल्या माळ्यावर अनाधिकारे पोटमाळा टाकण्याचे काम सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे.परंतु असे असतानाही वसई महापालिका सदर अनधिकृतपणे केलेल्या कंपनीच्या बांधकामावर जाणीवपूर्वक कानाडोळा करत असल्याचा थेट आरोप तक्रार दाराने केला असून जर हे अनधिकृत बांधकाम गोर गरिबांनी केले असते तर त्याच्यावर वसई मनपाच्या संबंधित विभागाने सदरचे अनधिकृत बांधकामावर तात्काळ धडक कारवाई करून बांधकाम उध्वस्त केले असते.असा हवाला देत राजदीप इंडस्ट्रीतील संपूर्ण अनधिकृतपणे करण्यात आलेल्या बांधकामावर तूर्तास तोडक कारवाई करावी अशी मागणी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे लावून धरली आहे.

## भाजपाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती....पान नं.४

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार म्हणजे वंचित, दुर्बल घटकांसाठी आशेचा किरण आहे. आजच्या या मेडिकल कॅम्पद्वारे त्यांच्या विचारांना कृतीत उतरवण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक व्यक्तीला आरोग्याची आणि सन्मानाची हमी देणे हाच आमचा खरा आदरांजलीचा मार्ग आहे. अशी प्रतिक्रिया वसईच्या आमदार स्नेहा दुबे पंडीत यांनी दिली.अभियानाचे संयोजक उत्तम कुमार यांनी बोलताना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य आणि त्यांचा सामाजिक समतेचा संदेश आम्हाला नेहमीच प्रेरित करत आला आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आम्ही 'सम्मान अभियान' अंतर्गत आरोग्याच्या माध्यमातून समाजसेवेचा संकल्प केला. या मेगा मेडिकल कॅम्पमुळे गरजू लोकांना दर्जेदार आरोग्य सेवा मोफत उपलब्ध करून देता आल्या, ही आमच्यासाठी मोठी समाधानाची बाब आहे. नागरिकांचा मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा आम्हाला पुढील सेवाभावी उपक्रमांसाठी बळ देणार आहे. भविष्यातही आम्ही असेच उपक्रम राबवत राहू, आणि डॉ. बाबासाहेबांनी दाखवलेल्या मार्गावर चालत समाज कल्याणासाठी कटिबद्ध राहू. अशी प्रतिक्रिया दिली.भाजपा 'सम्मान अभियान' अंतर्गत हा उपक्रम राबवला गेला कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून, सिद्धार्थ जागृती संघ चे अध्यक्ष रमेश शेंडे, सचिव अतुल मोठगरे, कार्याध्यक्ष उषा ठोमरे, भाजपा जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील, जिल्हा महासचिव अभय कक्कड, जिल्हा महासचिव प्रज्ञा पाटील, वसई विधानसभा प्रमुख मनोज पाटील,, वसई पश्चिम मंडळ अध्यक्ष आशिष जोशी, वसई पूर्व मंडळ अध्यक्ष उदय शेट्टी, शेखर धुरी उपस्थित होते.अभियानाचे संयोजक उत्तम कुमार, दिलीप गायकवाड सहसंयोजक व युवा संयोजक सिद्धेश तावडे यांच्या माध्यमातून कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाळा सावंत, शेमल अजगीया, रामानुजम सिंग, श्रीकुमारी मोहन, शिला अय्यर, केतन गांधी, चारुशीला घरत, सीमा सेंगर, देवी रेड्डी, सुनील चौहान, निखिल बाबर यांनी विशेष मेहनत घेतली.

## कामगार हा जगाचा निर्माता...पान नं.४

आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. श्रीपाल सबनीस म्हणाले की ही सृष्टी कामगारांच्या कष्टावर उभी राहिली आहे. कामगार हा जगाचा निर्माता आहे म्हणूनच जगातल्या कामगारांनी एक होण्याच्या दृष्टीने जे तत्वज्ञान मानलं जो इतिहास निर्माण केला त्या कामगारांच्या कष्टाची त्याच्या कामाची आठवण ठेवण्यासाठी त्याला वंदन करण्यासाठी १ मे हा दिवस महत्वाचे आहे. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही फार मोठी होती. या चळवळीत अनेकांनी प्राणांची आहुती दिली होती. या दिनी मला महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन सन्मान केला त्याचा मला सार्थ अभिमान आहे.

राजन नायर म्हणाले की देशात महाराष्ट्राचे योगदान हे फार मोठे आहे. महाराष्ट्रातील कामगार चळवळ ही सर्वांना न्यात आहे. पुण्यातील पिंपरी — चिंचवड ही उद्योगनगरीने अनेक रिकाम्या हातांना काम दिले आणि देत आहे. नारायण लोखंडे यांच्या नावाच्या पुरस्काने मला सन्मानित केले. याचा मला सार्थ अभिमान आहे. ब्रिटिश राजवटीत लोखंडे यांच्यामुळे देशभरातील कामगारांना रविवारी सुट्टी मिळाली.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक भगवानराव वैराट यांनी केले तर सूत्रसंचालन के. बी. गायकवाड यांनी केले.

आता बातमी वेबपोर्टलवर... www.yuvashaktiexpress.in

# भारतामध्ये मुस्लिमांनी दान केलेल्या जमिनीच्या वादांची सुरू असलेली सततची लढाई, नेमक्या अडचणी काय?

काही दिवसांपूर्वी वक्फ (दुरुस्ती) कायद्याला संसदेत मोठ्या विरोधानंतरही मंजुरी मिळाली. परंतु, या कायद्याला होणारा विरोध अजूनही सुरुच आहे. देशातील अनेक भागात याविरोधात आंदोलनं सुरू आहेत. काही ठिकाणी या आंदोलनाला हिंसक वळण लागलं. अनेकांनी या कायद्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली असून त्यावर सुनावणीही सुरू आहे.मोदी सरकारनं आणलेल्या एका नव्या वक्फ (दुरूस्ती) कायद्यामुळं भारतीय मुस्लिमांनी शतकानुशतके दान केलेल्या मालमत्तांवर पुन्हा एकदा लक्ष केंद्रीत झालं आहे.वक्फ ही अनेक मुस्लिमबहुल देशांमध्ये दिसून येणारी एक परंपरा आहे, जिथे या मालमत्तांचा वापर शाळा, अनाथाश्रम, रुग्णालये, बँका आणि दफनभूमी चालवण्यासाठी केला जातो.

भारतातील वक्फ मालमत्तांचे व्यवस्थापन विविध राज्य सरकारांनी स्थापन केलेल्या वक्फ बोर्डांद्वारे केले जाते. एक केंद्रीय संस्था, ज्याला केंद्रीय वक्फ परिषद (सेंट्रल वक्फ कौन्सिल) म्हणतात, ती कामकाजाचे समन्वय साधकायदेशीर लढाई, हेच मोठे आव्हान

पण देशभरात अनेक वर्षांपासून हजारो हेक्टर जमीन, ज्यांची किंमत कोट्यवधी रुपये आहे, त्या कायदेशीर वादात अडकल्या आहेत.

उदाहरण सांगायचं झालं तर एकट्या दिल्लीचं सांगता येईल. भारताच्या राजधानी दिल्लीत अशा प्रकारच्या हजारहून अधिक मालमत्ता आहेत, ज्यामध्ये मशिदी, कब्रस्ताने आणि दर्ग्यांचा समावेश आहे.

शहराच्या शतकानुशतके जुन्या इस्लामिक वारशाचे प्रतीक असलेल्या या मालमत्तांचा उपयोग धार्मिक, शैक्षणिक आणि सामाजिक कल्याणासाठी केला जात आला आहे. यापैकी किमान १२३ मालमत्ता दीर्घकालापासून दिल्ली वक्फ बोर्ड आणि केंद्र सरकार यांच्यात मालकीच्या वादात अडकल्या आहेत.या प्रकरणांमध्ये दिल्लीतील हे वाद त्यातील केवळ एक छोटा भाग आहेत. भारतभरातील वक्फ बोर्ड हजारो अशा प्रकरणांमध्ये खासगी पक्षांशी, मुस्लिम आणि बिगरमुस्लिम दोघांशी तसेच सरकारी विभागांशीही कायदेशीर लढाई लढत आहेत.

हेच एक मोठं आव्हान आहे, ज्यावर तोडगा काढण्यासाठी केंद्र सरकारने वक्फ सुधारणा कायदा २०२५ लागू केला आहे. या नव्या कायद्यानं विद्यमान व्यवस्थेत डझनभर मोठे बदल केले आहेत.

अनेक मुस्लिम नेते आणि विरोधी पक्षांनी या नव्या कायद्यावर टीका केली आहे. त्यांनी हा कायदा अल्पसंख्यांकांचे हक्क कमकुवत करण्याचा प्रयत्न असल्याचा गंभीर आरोप केला आहे.

वक्फविषयक वाद होण्यामागची कारणं

काही राज्यांमध्ये या कायद्याच्या विरोधात आंदोलनं झाली असून, हिंसाचारही उसळला आहे. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने देखील या कायद्याविरोधातील अनेक याचिकांवर सुनावणी सुरू केली आहे.

वक्फविषयक वाद निर्माण होण्यामागे अनेक कारणं असतात, अस्पष्ट भूमिस्वामित्व (मालकी) हक्क, संपत्ती वक्फ असल्याच्या केवळ मौखिक (तोंडी) घोषणा, विसंगत कायदे, भू-माफियांशी संगनमत आणि वर्षानुवर्षे सरकारी दूर्लक्ष.

सरकारी नोंदीनुसार, भारतात एकूण ८७२,८५२ वक्फ मालमत्तांपैकी (कागदोपत्री), किमान १३,२०० मालमत्तांबाबत कायदेशीर वाद सुरू आहेत. ५८,८८९ मालमत्तांवर अतिक्रमण झाले आहे आणि ४३६,००० हून अधिक मालमत्तांची स्थिती अजून स्पष्ट नाही.

यापैकी अनेक दावे राष्ट्रीय स्तरावर लक्ष वेधून घेणारे ठरले आहेत. उदाहरणार्थ, केरळमधील प्रामुख्याने ख्रिस्ती लोकवस्ती असलेल्या एका गावावर, गुजरातमधील अनेक शासकीय इमारतींवर आणि कर्नाटकमधील शेतकऱ्यांकडून वापरल्या जाणाऱ्या मोठ्या भूभागावर वक्फ बोर्डांनी चुकीचा मालकी हक्क सांगितल्याचा आरोप करण्यात आला आहे.केंद्र सरकारचं म्हणणं आहे की, देशभरात वक्फ बोर्डांनी त्यांच्या ५,९७३ मालमत्ता स्वतःच्या मालकीच्या असल्याचा दावा केला आहे. मात्र, वक्फ बोर्डांनी हे आरोप फेटाळले असून त्यांचा दावा आहे की, या स्थळांवर त्यांचा कायदेशीर हक्क आहे.

काही वादांची सुरुवात १९४७ मधील भारताच्या फाळणीपर्यंत जाऊन पोहोचते. पंजाबमध्ये राज्यातील ७५,९६५ वक्फ मालमत्तांपैकी निम्म्याहून अधिक मालमत्ता 'बळकावल्या गेलेल्या' (अतिक्रमण) आहेत.

फाळणीनंतर झालेल्या स्थलांतराचा हा परिणाम असून अनेक मुस्लिम इस्टेट्स अनिश्चित अवस्थेत राहिल्या.

'काही मूळ मालक पाकिस्तानला गेले आणि काही नव्याने आलेल्या लोकांनी त्याच मालमत्तांवर हक्क सांगितला,' असं कोलकात्यातील एका विद्यापीठात अध्यापन करणारे मोहम्मद रियाझ यांनी सांगितलं.

दिल्लीतील १२३ वादग्रस्त वक्फ मालमत्तांवर केंद्र सरकारच्या नगरविकास आणि गृहनिर्माण मंत्रालयाच्या अंतर्गत विभागांचा दावा आहे. तर वक्फ मंडळाचा दावा आहे की, या मालमत्तांवर त्यांचा हक्क ब्रिटिश कालखंडापासून आणि त्याहीपूर्वीपासून आहे.

हे वाद मिटवण्यासाठी सरकार आणि न्यायालयांनी केलेले प्रयत्न अद्याप यशस्वी झालेले नाहीत.१९२३ मध्येच ब्रिटिशशासित भारतातल्या कायदेमंडळ सदस्यांनी वक्फ मालमत्ता मुस्लीम समुदायाच्या नियंत्रणातून बाहेर जात असल्याबाबत चिंता व्यक्त केली होती.

त्यांनी या मालमत्तांची नोंदणी बंधनकारक करण्याचा आग्रह धरला होता. कारण ज्या विश्वस्तांनी या मालमत्तेची देखभाल करायची होती, तेच स्वतःला मालक म्हणून नाव नोंदवत होते आणि टीकाकारांच्या मते, ही प्रथा आजही काही ठिकाणी सुरू आहे.

प्रा. रियाझ म्हणतात की, जमिनीच्या किमती वाढल्यामुळं असे वाद वाढले आहेत.

'४०-५० वर्षांपूर्वी प्रत्येक जमिनीच्या तुकड्याची काळजी घेतली जात नव्हती, पण जसजसं त्याचं महत्त्व वाढू लागलं. तसतसं समाजातील सदस्य किंवा देणगीदारांचे वंशज वक्फ जमिनीवर आपले हक्क सांगू लागले.

ज्यामुळं अनेक ठिकाणी वाद निर्माण होतात, जिथे लोक पिढ्यानपिढ्या राहत आले आहेत, कधी जमिनी खरेदी केल्या आहेत किंवा कधी त्यावर अतिक्रमण केलं आहे,' असे ते म्हणतात.

वक्फ बोर्डानं खूप काळ दुर्लक्ष केलेल्या जमिनीवर अचानक दावा करण्याचा प्रयत्न केल्यामुळंही वाद निर्माण होतात. त्यामुळं, जरी त्या सरकारी संस्था असल्या तरी, वक्फ बोर्डाच्या मालमत्तेवर दावा करण्याच्या अनियंत्रित शक्तीवर टीका करण्यात येत आहे.

हैदराबाद येथील मोहम्मद इस्माईल खान हे वक्फ संबंधित अनेक खटल्यात सहभागी असलेले वकील आहेत.

ते म्हणतात की, प्रसारमाध्यमं आणि राजकारणी हे वारंवार वक्फ न्यायाधिकरणाचा (वक्फ वादविवाद ऐकणारी विशेष न्यायिक संस्था) निणर्य अंतिम आहे, असं सांगतात. मला याचीच चिंता आहे. परंतु, वरच्या कोर्टाला याचे अंतिम अधिकार आहेत, असं ते म्हणाले.अफरोज आलम साहील हे पत्रकार आहेत. त्यांनी वक्फ संबंधित मुद्द्यांचे सविस्तरपणे वार्तांकन केले आहे. त्यांनी २०११ मध्ये माहिती अधिकार कायद्यानुसार दिल्लीतल्या दफनभूमींबद्दल एक प्रश्न विचारला होता.

सुरुवातीला दिल्ली वक्फ बोर्डाने ५६२ दफनभूमींची नोंद केली होती. नंतर ही संख्या ४८८ पर्यंत कमी केली गेली.

पण २०१४ मध्ये, बीबीसी हिंदीच्या एका अहवालात एका वक्फ बोर्डाच्या अधिकाऱ्यानं सांगितलं की, दिल्लीमध्ये केवल ७० ते ८० दफनभूमीच त्यांच्या देखरेखीखाली उरल्या आहेत.

ही अस्पष्टता इतर मालमत्तांबाबतही दिसून येते. अफरोज सांगतात की, २००८ मध्ये दिल्ली वक्फ बोर्डाने शहरातील १,९६४ मालमत्ता त्यांच्या अखत्यारित असल्याची यादी जाहीर केली होती.

मात्र याच महिन्यात केंद्र सरकारने दिलेल्या एका निवेदनात ही संख्या केवल १,०४७ इतकी असल्याचे सांगितले. त्यामुळं या यादीतून गायब झालेल्या ९१७ मालमत्तांचं काय झालं, हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही.



आता बातमी वेबपोर्टलवर...
बहुजन महा VIEWS & NEWS
www.bahujanmahaviewsandnews.in
संपादक तुषार गायकवाड



# भाजपाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त 'सम्मान अभियान' अंतर्गत मेगा मेडिकल कॅम्प संपन्न

## 'डॉ. बाबासाहेबांच्या विचारांना समर्पित आरोग्य उपक्रमः खा. हेमंत सावरा

**आरोग्याची आणि सन्मानाची हमी देणे हाच आमचा खरा आदरांजलीचा मार्ग : आ. स्नेहा दुबे पंडीत**

वसई : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भाजपा कडून 'सम्मान अभियान' अंतर्गत सिध्दार्थ जागृती संघच्या संयुक्त विद्यमाने भव्य मेगा मेडिकल कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. बऱ्हामपूरयेथील बुद्धविहार येथे पार पडलेल्या कार्यक्रमास पालघर जिल्ह्याचे खासदार डॉ. हेमंत सावरा, वसईच्या आमदार स्नेहा दुबे पंडीत यांनी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लावली. सर्व डॉक्टर व परिचारिका यांचा सत्कार स्नेहा दुबे पंडित यांच्या हस्ते करण्यात आला.

या कॅम्पमध्ये सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी, रक्तदाब, मधुमेह, दंतचिकित्सा, नेत्र तपासणी, स्त्रीरोग तपासणी यासारख्या विविध सेवा पुरवण्यात आल्या.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला सामाजिक समतेचा संदेश आम्हाला आरोग्यसेवेमार्फत सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवायचा आहे. 'सम्मान अभियान' अंतर्गत हा मेगा मेडिकल कॅम्प म्हणजे त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्याची एक छोटीशी प्रेरित कृती आहे. अशी प्रतिक्रिया पालघरचे खासदार डॉ. हेमंत सावरा यांनी दिली.




# कामगार हा जगाचा निर्माता – श्रीपाल सबनीस

**महाराष्ट्र ही संताची, शूरवीरांची, कष्टकऱ्यांची, कामगारांची भूमी - माजी आमदार उल्हासदादा पवार**

महाराष्ट्र ही संताची, शूरवीरांची, कष्टकऱ्यांची, कामगारांची भूमी आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात १०६ आंदोलक हुतात्मे झाले आहेत. या हुतात्म्यांच्या बलिदानामुळे व मराठी माणसाच्या आंदोलनामुळे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत उल्हासदादा पवार यांनी केले. जागतिक कामगार दिन व महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल आणि झोपडपट्टी सुरक्षा दल या संघटनेच्या माध्यमातून सामाजिक चळवळीत उपेक्षितांना न्याय देण्यासाठी जीवाची परवा न करता सातत्याने आक्रमकपणे अन्याय अत्याचाराच्या विरोधात लढा उभा केला. अशा कार्यकर्त्यांना सन्मानित करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष उल्हास दादा पवार हे होते. तर कार्यक्रमाचे संयोजक भगवानराव वैराट हे होते. या प्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर कामगार नेते राजन नायर यांना नारायण लोखंडे पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. शाल, श्रीफळ

# पालघर जिल्हा पोलीस दल ठरलं महाराष्ट्रात नंबर वन, शंभर दिवसांच्या सात कलमी कार्यक्रमामध्ये बाजी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमात पालघर जिल्हा पोलीस दल राज्यात अव्वल ठरले आहे. वेबसाईट सुधारणा आणि तक्रार निवारणासह अनेक उपक्रमांमध्ये त्यांनी उत्कृष्ट काम केले. भारतीय गुणवत्ता परिषदेने केलेल्या मूल्यांकनात पालघर पोलिसांनी ९०.२९ टक्के गुण मिळवले. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामार्फत १०० दिवसांचा सात कलमी कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्र राबविण्यात आला आहे. १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाचे भारतीय गुणवत्ता परिषदेतर्फे अंतिम मूल्यमापन करण्यात आले. या निकालानुसार वेबसाईट सुधारणा, कार्यालयीन सोयीसुविधा, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, गुंतवणुकीस चालना, तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी मुद्यांवर उत्कृष्ट कार्य केल्यामुळे पालघर जिल्हा पोलीस दल राज्यात प्रथम क्रमांकावर असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवर पोस्ट करत सर्वोत्तम कामगिरी बजावलेल्या महाराष्ट्रातील शासकीय कार्यालयांमध्ये प्रथम क्रमांकवर असलेल्या पालघर जिल्हा दलाचे अभिनंदन केले आहे. पालघर जिल्हा पोलीस दलाला १०० पैकी ९०.२९ टक्के गुण मिळाले आहेत. तर गडचिरोली दुसऱ्या क्रमांकावर आहे.पालघर जिल्हा पोलीस दलाकडून प्रशासन लोकाभिमुख आणि गतिमान करताना वेबसाईट अद्यावत करून युजर फ्रेंडली बनवण्यात आली. नागरिकांसाठी चॅट बॉक्स सुविधा, सुकर जीवनमान अंतर्गत सायबर सुरक्षित पालघर मोहीम, एआय बेस चॅट बोट, स्वच्छता मोहीम, तक्रार निवारण दिन, ई ऑफिस कार्यप्रणाली, विजिटर मॅनेजमेंट सिस्टीम, कार्यालयीन कामकाजामध्ये एआयचा वापर, पेट्रोलिंगवर देखरेखीसाठी थर्ड आय एप्लीकेशन असे नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आले.पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली पालघर जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व अंमलदार तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सात कलमी कार्यक्रम यशस्वीपणे राबवला आहे.

गडचिंचले हत्या कांडानंतर स्वतःची प्रतिमा सुधारण्यात पालघर पोलिसांना यश आल्याचे मत पालघर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी व्यक्त केले असून याबाबत समाधान व्यक्त केले. सायबर गुन्हे मुक्त पालघर जिल्हा आणि जनसंवाद अभियान यांसारखे उपक्रम महत्वाचे ठरल्याचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील म्हणाले आहेत.

## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय- ९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad
RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ मे. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in